आपल्या शहरातील प्रत्येक बातमी

SOCIAL MEDIA EDITION

|| श्रीकृष्णम् वंदे जगतगुरुम् ||

# अध्ययन समाचार

आता रोज रहा अपडेट!

सुविचार
एक चांगला विचार अनेक वाईट विचारांना नाहीसा करतो.

कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805 | भ्रमणध्वनी : 9422158005 | दूरध्वनी : 07223-222005 | jitendrarode77@gmail.com | Adhayayn Samachar

गुरुवार दि.७ ऑगस्ट २०२५

## अकोला येथिल श्री शिवाजी विद्यालय येथे
## सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

अध्ययन समाचार वृत्त
अकोला दि.७ । प्रतिनीधी

स्थानिक जुने शहरातील शंकरलाल खंडेलवाल आणि क्विक हिल फाउंडेशन यांच्या विद्यमाने श्री शिवाजी विद्यालय, मुख्य शाखा, अकोला येथे दिनांक 6 ऑगस्ट रोजी इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा विषयक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे आयोजन शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. विजय ठोकळ सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे उपमुख्याध्यापक मा. श्री. हिम्मतराव गवई सर होते. प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाचे शिक्षक प्रतिनिधी श्री. अमर देशमूख सर उपस्थित होते.



कार्यक्रमासाठी विशेष मार्गदर्शक म्हणून श्री. सुमित सपकाळ, आणि श्री. यश भालेराव हे शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला येथील बीसीए अंतिम वर्षाचे विद्यार्थी, उपस्थित होते. या कार्यशाळेमध्ये सायबर वारीयर्सनी सर्व विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व, इंटरनेटचा सुरक्षित वापर,सायबर गुन्ह्यांपासून बचावाचे उपाय, तसेच वैयक्तिक माहितीचे संरक्षण कसे करावे याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे सायबर जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार आभार प्रदर्शन विद्या वसु मॅडम यांनी केले. या कार्यशाळेसाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षा विषयक माहिती आत्मसात करत जागरूकतेचा संदेश घेतला.

9405989967,7559229571

मंगलम् स्टील होम क्रॉकरी

आमच्याकडे सर्व गृहउपयोगी वस्तू
उत्तम प्रतीचे वाजवी दरात मिळेल.
तसेच आमच्याकडे मोळ घेतल्या जाईल.



बनोसा रोड, एच डी एफ सी बँक जवळ, दर्यापूर

अध्ययन समाचार